**AY–1124**

## B.Com. Part—I (Semester—II) Examination

## (Optional Languages)

## MARATHI

Time : Three Hours] [Maximum Marks : 80

**सूचना :—सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. आ. ह. साळुंखे यांनी 'स्वातंत्र्याची महती' 'स्वातंत्र्य : संकल्पना आणि व्यवहार' या पाठाच्या द्वारे कशी पटवून दिली आहे ? 10

**किंवा**

"जीवनातील वास्तव चित्रण हे साहित्याला श्रेष्ठत्व प्रदान करते'' या विधानातून डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी 'सारे युग वाट याहत आहे' या पाठात कोणते मागणे आधोरेखित केले आहे ?

2. मलाला युसुफझई यांचे प्रेरणादायी व्यक्तिचित्र थोडक्यात रेखाटा. 6

**किंवा**

'प्रशासक नेता' म्हणून वसंतरावानी आपली ओळख जनतेला करुन दिली हे प्रशासक नेता' या पाठाद्वारे प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी कसे पटवून सांगितले थोडक्यात सांगा.

3. रमेश अंधारे यांनी 'अवधूत' या पाठामधून 'शेतीनिष्ठ बापाचा आणि नोकरनिष्ठ मुलांचा 'भावनिक संघर्ष कशाप्रकारे वर्णन केला आहे ? विवेचन करा. 10

**किंवा**

आक्काची व्यक्तिरेषा स्पष्ट करून तिला कोणकोणत्या संकटाना तोंड वावे लागले ? हे 'पीळ' या पाठाद्वारे ऐश्वर्य पाटेकर' यांनी कसे अधोरेखित केले आहे.

4. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची होणारी महालुटीचे वास्तवदर्शी चित्रण सदानंद देशमुख यांनी 'महालूट' या पाठाद्वारे कसे रेखाटले आहे ? 6

**किंवा**

किशोर सानप यांनी 'दिंडी गेली पुढे' या पाठातून कोणते विचार व्यक्त केले थोडक्यात सांगा.

5. कवी सं. गं पाचपोळ यांनी 'माय' या कवितेतून स्वत:च्या आईचे स्मरण व तिच्याविषयीची कृतज्ञता कशी व्यक्त केली ? 10

**किंवा**

'ते आले, त्यानंतरची गोष्ट' या कवितेतून प्रभू राजगडकर यांनी आदिवासी समूह कसा कोंडीत सापडतो याचे वास्तव चित्रण कसे केले आहे ? स्पष्ट करा.

6. वीरा राठोड यांनी 'अभंग' या कवितेतून सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचा ताण कसा अधोरेखित केला आहे ? 6

**किंवा**

'यापुढे माझी लढाई' ह्यासिद्धार्थ भगत यांच्या कवितेचा आशय स्पष्ट करा.

7. पत्रलेखन म्हणजे काय ? त्यांचे स्वरूप थोडक्यात सांगून पत्रव्यवहाराचे प्रमुख प्रकार कोणते ? ते सांगा ? 10

**किंवा**

'मागणी पत्र' म्हणजे काय ? हे सांगून मागणी पत्राचा नमुना तयार करा.

8. खालील उतारा वाचून त्याचा आशय लिहा :— 6

कोणत्याही काळी जे टिकून राहते त्याला सार्वकालिक असे म्हणतात. त्याचप्रमाणे असे चिरकाल टिकून राहण्याची क्षमात म्हणजे सार्वकालिकता या सार्वकालिकतेमागे मानवी जीवनाशी निगडित विरतन मूल्ये कारणीभूत असतात, जीवनानुभवास भिडणारी ही मूल्ये मानवी जीवनाला समृद्ध करण्याचे कार्य करीत राहतात. म्हणून त्यांचे नित्यानूतनत्व नेहमीच अबाधित असते. त्यामुळेच मानवी मूल्यांचे महत्त्व सार्वकालिक असते.

मानवी जीवनाला पुष्ट करण्यात जितके सामाजिक पर्यावरण महत्त्वाचे योगदान देते. तितकेच नैसर्गिक पर्यावरण. म्हणून निसर्गातील विविध विभ्रम, पर्यावरणातील परिवर्तन, नैसर्गिक आपत्ती या मानवी जीवनाला प्रभावित करणाऱ्या बाबी सार्वकालिक मूल्यांची जागा घेतात. ज्या साहित्यात त्यांचा अंतर्भाव असतो ते सार्वकालिक या पदाला पातोचण्याची शक्यता अधिक असते. सूर्योदय, मध्यान्ह, सूर्यास्त, चंद्रोदय, चांदणे, चंद्रास्त तसेच धूमकेतूसारखे आकाशातील अंगणात आपले अस्तित्व ठरविणारे घटक सार्वकालिक ठरतात. त्यांची वर्णने प्राचीन साहित्यात सापडतात. आपल्या अनुभवाशी साधर्म्य साधणारे असे वर्णन म्हणून आपणास भावते. वाङ्मयाची अक्षरत्वाची संकल्पना अशा सार्वकालिक मूल्यांवस्व आधारलेली आहे.

अशोक राणा

**किंवा**

खालील दिलेल्या इंग्रजी भाषेतील उताऱ्याचे मराठी भाषेत भाषांतर करा :—

Champions aren't made in gyms. Champions are made from something they have deep inside them — a desire, a dream, a vision. They have to have the skill and the will. But the will must be stronger than the skill. Successful professionals thrive in the same manner.

9. (अ) **एका** वाक्यात उत्तरे लिहा :—

(1) 'स्वातंत्र्य' हा शब्द कोणत्या शब्दाचे भाववाचक नाम आहे ? 1

(2) वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचे किती वर्षे मुख्यमंत्रीपद उपभोगले ? 1

(3) आदिवासी स्त्री जागृत होऊन संघर्षरत झाली पाहिजे अशी भावना कोणत्या कवियित्रीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे ? 1

(4) 'नून वलक्बालम' हा शब्द कोणत्या धर्मग्रंथामध्ये आहे. 1

(ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा :—

(1) एकतर यांना माझं ____________ समजून चार्ज लावा नाहीतर आतम्य याचं खातं उघडा''. 1

(अ) गेस्ट (ब) भाऊ

(क) बहिण (ड) यापैकी नाही

(2) 'पोझो' चे हखल्याचे त्यांना कळसे. 1

(अ) आंगठी (ब) घडयाळ

(क) बूट (ड) यापैकी नाही

(3) ___________ च्या चिंता मागे टाकून वारकरी दिंडीत सहभागी झाले होते. 1

(अ) मुलां (ब) समाजा

(क) घरादारा (ड) संसारा

(4) कुसातून मोडल्या औतावाणी ___________ कचकून गेली. 1

(अ) पाय (ब) कंबर

(क) पाठ (ड) मान

(क) योग्य जोड्या जुळवा :—

| | | |
|---|---|---|
| (1) अजीम नवाज राही | (अ) कबीर | 1 |
| (2) जयराम खेडेकर | (ब) या पुढे माझी लढाई | 1 |
| (3) सिद्धार्थ भभत | (क) देणं | 1 |
| (4) लोकनाथ यशवंत | (ड) दखेशी | 1 |

(ड) वाक्य पूर्ण करून लिहा :—

(1) _________ हा परपस्परांतील संवादाचा एक प्रभावी आणि उपयुक्त प्रकार आहे. 1

(2) मौखिक संवादापेक्षा पत्राद्वारे साधलेला _________ नेहमीच अधिकृत मानला जातो. 1

(3) व्यवहारामध्ये कोणतेही अडथळे येऊ नयेत या साठी आपल्याला जे म्हणायचे ते _________ मांडावे लागते. 1

(4) _________ हा शब्द अनेकार्थांनी वापरला जातो. 1